# प्रेसनोट

नाशिक,
दिनांक : २१/०८/२०१८

**आलोसे १) नलिनी काशिनाथ पाटील, अधीक्षिका, व २) प्रशांत उत्तम देसले, लिपीक नेमणुक बालनिरीक्षणगृह उंटवाडी, नाशिक, ता.जि.नाशिक यांना कॅरमबोर्डची लाच स्विकारतांना अटक**

---

यातील तक्रारदार यांचे मुलास मा.बाल न्यायमंडळ नाशिक यांचे आदेशाने बाल निरीक्षणगृह नाशिक येथे दाखल केले होते. त्यास मा.बाल न्यायमंडळ कोर्टातून जामिन करुन घेण्यासाठी बालसुधारगृह अधीक्षक यांचेकडून पीओ लेटर देणेकरीता व जामिन मिळाल्यानंतर, सहकार्य करुन मुलास सोडण्यासाठी आलोसे नं.१) नलिनी काशिनाथ पाटील, अधीक्षिका, व २) प्रशांत उत्तम देसले, लिपीक नेमणुक बालनिरीक्षणगृह उंटवाडी, नाशिक, ता.जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेचे स्वरुपात कॅरमबोर्डची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीवरुन आज दिनांक २१/०८/२०१८ रोजी ला.प्र.वि.नाशिक पथकाने सापळा आयोजित करुन पडताळणी केली असता आलोसे नं.१) नलिनी काशिनाथ पाटील, अधीक्षिका, व २) प्रशांत उत्तम देसले, लिपीक नेमणुक बालनिरीक्षणगृह उंटवाडी, नाशिक, ता.जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेचे स्वरुपात कॅरमबोर्डची मागणी करुन सदर कॅरमबोर्ड बाल निरीक्षणगृह उंटवाडी नाशिक अधीक्षिका कार्यालयामध्ये स्विकारला असता त्यांना पकडण्यात आले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक तर्फे नागरीकांना आवाहन करण्यांत येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्रातील कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दूरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी **लॅंडलाईन ते लॅन्डलाईन व मोबाईल ते लॅन्डलाईन अशी टोल फ्री नंबर १०६४** ची सेवा सुरु करण्यांत आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणालीसंबंधी व करावयाच्या तक्रारीसंबंधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अनं | युनिटचे नांव | दूरध्वनी क्रमांक | **टोल फ्री नंबर** |
|---|---|---|---|
| १ | नाशिक | ०२५३–२५७५६२८, २५७८२३० | **१०६४** |
| २ | अहमदनगर | ०२४१–२४२३६७७ | **१०६४** |
| ३ | धुळे | ०२५६२–२३४०२० | **१०६४** |
| ४ | नंदूरबार | ०२५६४–२३०००९ | **१०६४** |
| ५ | जळगांव | ०२५७–२२३५४७७ | **१०६४** |

**( विश्वजीत जाधव )**
वाचक पोलीस उपअधीक्षक
पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक करीता